**( इंग्रजीमध्ये टंकलिखित केलेल्या न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद )**

मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायाधिकारात
सर्वसाधारण मूळ दिवाणी अधिकारिता
रिट याचिका क्रमांक ३०४८ /२०२२ ची

मुंबई टपाल कर्मचारी
सहकारी पतसंस्था मर्यादित,
जीपीओ इमारत, तळ मजला,
फोर्ट, मुंबई- ४०० ००१. . .. याचिकाकर्ता

विरुद्ध

१. आयकर अधिकारी
प्रभाग १७(२ ) (1), मुंबई
खोली क्रं.११५, १ ला मजला,
कौटिल्य भवन, सी -४१ ते सी -४३,
जी ब्लॉक, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स,
बांद्रा (पूर्व) ,मुबई ४०००५१.
नॅशनल फेसलेस असेसमेंट सेंटर, दिल्ली.

३. प्राप्तिकर विभागाचे प्रधान आयुक्त,
मुंबई १७,मुंबई,
खोली क्रमांक १२०,, पहिला मजला,

सी ४१ ते सी ४३, कौटिल्य भवन,
सी ४१ ते सी ४३, जी ब्लॉक,
बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स,
बांद्रा (पूर्व), मुंबई ४०००५१.
बी.४. भारत सरकार,
सहसचिव आणि विधी सल्लागार मार्फत,
शाखा सचिवालय,
४. भारत सरकार,
सहसचिव आणि विधी सल्लागार मार्फत,
शाखा सचिवालय,
कायदा व्यवहार विभाग,
कायदा आणि न्याय मंत्रालय,
आयकर भवन, एम.के. रोड,
मुंबई -४०००२०. .......... उत्तरवादी

श्री. जे. डी. मिस्त्री, ज्येष्ठ वकील सह श्री. मधुर अग्रवाल, अतुल के. जसानी, याचिकाकर्त्याचे वकील यांच्या सूचनेवरून.

सुरेश कुमार, उत्तरवादींचे वकील

न्यायमंच धीरज सिंग ठाकूर आणि

कमल खाटा, न्या.

राखीव ठेवले : ०२ फेब्रुवारी, २०२३

घोषित केले : २० फेब्रुवारी, २०२३

## <u>न्यायनिर्णय</u>

## <u>धीरज सिंग ठाकूर न्यायमूर्ति नुसार</u>

याचिकाकर्त्याने, आयकर अधिनियम १९६१ च्या कलम १४८ अनुसार दिनांक १९ मार्च २०२१ रोजी निर्गमित करण्यात आलेली नोटीस, पुन्हा (प्रकरण) उघडण्यात घेतलेल्या हरकतीस नकार देण्यास दिनांक २३ मार्च २०२२ चा आदेश तसेच उत्तरवादी क्र. २ यांनी अधिनियमाच्या कलम १४७ सह कलम १४४बी अनुसार करनिर्धारण वर्ष २०१४-१५ करिता दिनांक ३० मार्च २०२२ रोजी पारित केलेला करनिर्धारण आदेशास आव्हान दिले आहे.

२. महत्वाच्या बाबी संक्षिप्त स्वरूपात खालीलप्रमाणे आहेत :

याचिकाकर्ता ही महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० अनूसार एक नोंदणीकृत सहकारी पतसंस्था आहे, तिचे सदस्यत्व केवळ महाराष्ट्र आणि गोवा राज्यात कार्यरत भारतीय टपाल सेवा, भारत सरकारच्या कर्मचाऱ्यांपुरतेच मर्यादित आहे. संस्थेचा उद्देश म्हणजे तिच्या सभासदांमध्ये बचत करण्याच्या सवयीला उत्तेजन देणे तसेच सभासदांच्या कल्याणाकरिता कार्यक्रम हाती घेणे हे होय. असे नमूद केले आहे की, सभासदांकडून जमा

केलेल्या निधीतून तिच्या सभासदास कोणत्याही प्रतिभूतीविना बँकेच्या व्याजाच्या दरापेक्षा कमी दराने कर्ज पुरविणे.

याचिकाकर्त्याने दिनांक ३० मार्च २०१६ रोजी करनिर्धारण वर्ष २०१४-१५ करिता रुपये १३,३१,८०,८७७/- चया रकमेचा वजावटीचा दावा अधिनियमाच्या ८० पी अंतर्गत करून निरंक उत्पन्नाचे विवरण दाखल केले. त्यानंतर याचिकाकर्त्याचे प्रकरण छाननीकरीता निवडण्यात आले आणि कलम १४३ (२) अनुसार नोटीस निर्गमित करण्यात आली. अधिनियमाच्या प्रकरण सहा - ए अंतर्गत याचिकाकर्त्याने दावा केलेली वजावट हा वादमुद्द्यांपैकी एक मुद्दा छाननी दरम्यान अंकित करण्यात आला होता. याचिकाकर्त्याला अधिनियमाच्या कलम १४२ (१) अनुसार नोटीस दिनांक २७ सप्टेंबर २०१६ रोजी पाठवून अधिनियमाच्या प्रकरण सहा- ए अंतर्गत केलेल्या वजावटीच्या दाव्या संदर्भात कागदोपत्री पुराव्यासह इतर गोष्टींवर स्पष्टीकरण करण्यास सांगितले होते.

सदर नोटीसीला दिनांक १० ऑक्टोबर २०१६ च्या पत्राने तपशीलवार उत्तर सादर करण्यात आले, ज्यात असे स्पष्टीकरन देण्यात आले की याचिकाकर्ता अधिनियमाच्या कलम ८० पी (४) अंतर्गत संदर्भित सहकारी बँक नाही आणि याचिकाकर्त्याने अधिनियमच्या कलम ८० पी च्या पात्रतेच्या अटींची पूर्तता केली आहे. जसे की (अ ) करदाता

अधिनियमाच्या कलम ८० पी (१) अनुसार सहकारी संस्था होती. (ब) जी अधिनियमाच्या कलम ८० पी (२) (i) अंतर्गत आवश्यक उधारिची सुविधा तिच्या सभासदाना देण्याचा व्यवसाय करीत होती. (क) याचिकाकर्त्याला अधिनियमाच्या कलम पी (२) अनुसार संपूर्ण रकमेबाबत व्यवसायात नफा आणि लाभ म्हणून वजावटीचा दावा करण्याची परवानगी होती.

कलम 80 पी (2) (ए) (i) अंतर्गत आपल्या सदस्यांना आवश्यक असलेल्या ओएस डॉक क्रेडिट सुविधा आणि (सी) याचिकाकर्त्याला कायद्याच्या कलम 80 पी (2) (ए) अंतर्गत व्यवसायाच्या नफा आणि नफ्याच्या संपूर्ण रकमेसंदर्भात वजावटीचा दावा करण्याची परवानगी होती.

३. अखेरीस, २३ नोव्हेंबर २०१६ रोजी अधिनियमाच्या कलम १४३ (३) अन्वये मूल्यनिर्धारण आदेश पारित करण्यात आला, ज्याद्वारे अधिनियमाच्या कलम ८० पी अन्वये केवळ हॉलिडे होम्स शुल्क रू. १,००,६५०/- पर्यंतची वजावट नामंजूर करण्यात आली आणि परत करदात्याच्या उत्पन्नात " इतर स्त्रोत्रांमधून मिळणारे उत्पन्न" या शीर्षाखाली मिळवण्यात आली आणि म्हणून आवश्यक अभिप्रेत अर्थाने याचिकाकर्त्यानी सहकारी बँकेत निधी जमा केल्यामुळे मिळालेल्या व्याज उत्पन्नाच्या संदर्भात अधिनियमाच्या कलम ८० पी अन्वये वजावटीचा

याचिकाकर्त्याचा दावा मान्य करण्यात आला.

४. अधिनीयमाच्या कलम १४८ अन्वये १९ मार्च २०२१ रोजी करनिर्धारण अधिकारी यांच्याकडुन नोटिस निर्गमीत करण्यात आली, ज्यादवारे २०१४-१५ या करनिर्धारण वर्षाकारिता मूल्यनिर्धारणाची कार्यवाही पुन्हा चालू करण्याची मागणी करण्यात आली कारण अधिनीयमाच्या कलम १४७ च्या अर्थानुसार त्या वर्षाकारिताच्या उत्पन्नाकरीता करनिर्धारण टाळल होत.

५. कार्यवाही परत चालू करण्यकरित याचिकाकर्त्याला दिलेली कारणे खालीलप्रमाणे होती.

> ....२. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, करपात्र सहकारी संस्थेला सहकारी बँकांमधील ठेवी /गुंतवणुकीवर करनिर्धारण वर्ष २०१४-१५ संबंधित आर्थिक वर्षात रुपये ९२,०८,८९६/- इतके व्याज मिळाले. करदात्याने कलम ८० पी खाली "व्यवसाय उत्पन्न"या शीर्षाखाली मिळणाऱ्या व्याज उत्पन्नातून रुपये ९२,०८,८७६ /- वजावटीचा दावा केला. करदात्याचा आयकर अधिनियम १९६१ च्या कलम ८० पी (२ ) (i)

खालील वजावटीचा दावा हा कलम १४३ (३) खाली करनिर्धारण आदेश दिनांक २३-११-२०१६ नुसार मान्य करण्यात आला. आयकर अधिनियम १९६१ चे कलम ८० पी ( २ ) (ड) नुसार सहकारी पतसंस्थांना त्यांच्या अन्य कोणत्याही सहकारी संस्थेतील गुंतवणूकवरील व्याज किंवा लाभांश द्वारे प्राप्त केलेल्या उत्पन्नाच्या संदर्भात सहकारी संस्थांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशासाठी अशी संपूर्ण रक्कम वजावटीसाठी मंजूर करण्यात यावी. करदात्याचा कलम ८० पी (२) (ड ) खाली मान्य करण्यात आलेल्या वजावटीचा दावा हा वरील कलमाच्या तरतुदींशी अनुरूप नाही.

कलम ८० पी (२) (डी)अनुसार वरील मान्य केलेल्या नियमबाह्य वजावटीमुळे रुपये ९२,०८,८७६/- उत्पन्नाचे कमी आकरनिर्धारण झाले आणि परिणामी रुपये २८, ४५,५४२/- चा कर, व्याज आणि परिणामी दंड कमी आकारला गेला.

याचिकाकर्त्यांनी पुन्हा (प्रकरण) सुरू करण्याविरुद्ध हरकत दाखल केली होती, ती करनिर्धारण अधिकारी यांच्या दिनांक

२३ मार्च २०२२च्या आदेशाने नामंजूर करण्यात आली. अंतिमतः कलम १४७ आणि १४४बी अन्वये दिनांक ३० मार्च २०२२ रोजी करनिर्धारणाचा आदेश पारित करण्यात आला.

६. याचिकाकर्त्यांचे वरिष्ठ वकील मिस्त्री यांनी उद्युक्त केले की, पुनर्निर्धारण कार्यवाही सुरू करण्यासाठी करनिर्धारण अधिकारी यांच्याकडे निश्चित साहित्य पुरावा नाही आणि ही मतांतर होण्याबाबतचे उत्तम उदाहरण आहे. असे नमूद करण्यात येते की, अधिनियमाच्या कलम ८० पी अन्वये वजावटीच्या दाव्यासाठी याचिकाकर्ता हक्कदार असल्याबाबतचा मुद्दा करनिर्धारण अधिकारी यांनी विनिर्दिष्टपणे चर्चिला होता, परिणामी त्यानी अधिनीयमाच्या कलम १४३ (३) अन्वये कार्निर्धारणाचा आदेश पारित केला.

श्री मिस्त्री यांनी पुढे उद्युक्त केले होते की, नोंदविलेल्या कारनान वरून करर्निर्धारण अधिकारी हे सिद्ध करू शकले नाहीं की, सदर करर्निर्धारण वर्षासाठी आवश्यक असलेल्या महत्वाच्या गोष्टी करदाता पूर्णतः आणि खरेपनाने घोषित करण्यास अपयशी ठरला आहे आणि त्यामुले असे उद्युक्त केले की संपूर्ण पुननिर्धारण कार्यवाही कायद्याच्या नजरेतून अयोग्य होती. गुणवतेच्या आधारावर सुद्धा श्री मिस्त्री यांनी निवेदन केले की, करर्निर्धारण आधिकरयास

याचिकाकर्त्याचा अधिनियमाच्या कलम ८० पी नुसार वजावटीचा दावा नाकारण्याचे कारण नाही.

७ ) दुसऱ्या बाजूस असे की, महसूलाकरीता असलेल्या विद्वान वकिलांनी करनिर्धारण अधिकारी यांनी या याचिकेत आक्षेप घेतलेल्या करनिर्धारण आदेशात व्यक्त केलेल्या मताचे समर्थन आणि त्याची पुष्टी करण्याचा प्रयत्न केला. पुढे असे पण उद्युक्त करण्यात आले की, करनिर्धारन अधिकारी यांनी पुंननिर्धरणाची कार्यवाही याचिकाकर्त्याविरुद्ध सुरू करताना आणि समाप्त करताना कोणतीही अधिकारक्षेत्रविषयी चूक केली नव्हती. याचिकाकर्ते अधिनियमाच्या कलम ८० पी अन्वये वजावटीच्या लाभास हक्कदार नसताना देखील चुकीने असा लाभ देण्यात आला.

८) आम्ही पक्षकारांसाठी विद्वान वकिलांचे म्हणणे ऐकले.

९) करनिर्धारण अधिकाऱ्याने केलेली कार्यवाही अनिर्णित विषय राहिलेला नाही की त्याने सुरू केलेली पुननिर्धारण कार्यवाहीची, त्याने नोंद केलेल्या कारणमीमांसेच्या कसोटीवर तपासून घेतली पाहिजे. यापूर्वीच्या परिच्छेदांमध्ये अंशतः पून:सादर केलेल्या कारणांचे अवलोकन केल्यावर हे स्पष्ट होते की,याचिकाकर्त्याच्या बाजूने मंजूर केलेल्या अधिनियमाच्या कलम ८० पी (२) (ड ) अन्वये वजावटीचा दावा या कलमातील

तरतुदींशी सुसंगत नव्हता, ज्यामुळे परिणामी रुपये ९२,०८,८७६ /-च्या उत्पन्नाचे कमी करनिर्धारण झाले आणि त्यामुळे रुपये २८,४५,५४२/- चा कर कमी आकारण्यात आला. याबाबतची समाधानाची नोंद कारणआन मध्ये करताना करनिर्धारण अधिकाऱ्याने केवल अभिलेखाच्या अवलोकना वरुन केलेले आहे आणि त्याने इतर कोणत्याही महत्त्वाच्या सामग्रीचा आधार घेतलेला नाही.

१०) ही लक्षात घेतले पाहिजे की, सध्याच्या प्रकरणात करनिर्धारण हे अधिनियमाच्या कलम १४३(३) अनुसार होते, ज्या दरम्यान याचिकाकर्त्याला २७ सप्टेंबर २०१६ रोजी अधिनियमाच्या कलम १४२ (१ ) अंतर्गत नोटीस बजावण्यात आली होती, ज्याद्वारे याचिकाकर्त्याला प्रकरण-६ अ अंतर्गत केलेल्या वजावटीच्या दाव्याबाबत कागदोपत्री पुरावा स्पष्टीकरणासह देण्यासाठी सांगण्यात आले होते. याचिकाकर्त्यांने त्यस १०ऑक्टोबर २०१६ रोजी उत्तर सादर केले होते. त्या उत्तरासह याचिकाकर्त्यांने अधिनियमाच्या कलम ८० पी अनुसार पात्रतेच्या अटींची पूर्तता केल्याचे स्पष्टीकरण दिले आहे. त्यानंतर २३ नोव्हेंबर २०१६ रोजी करनिर्धारण आदेश पारित करण्यात आला. यावरून हे स्पष्ट होते की, हॉलिडे होमस शुल्क मधून प्राप्त उत्पन्नाच्या संदर्भातील अधिनियमाच्या कलम ८० पी अनुसार वजावटीचा एक भाग समजून नामंजूर

करताना सदर बाब उपस्थित करण्यात आली.

११) त्यामुळे करनिर्धारण अधिकारी यांच्याकडे कोणताही ठोस पुरावा (सामुग्री) नव्हती ज्याच्या आधारावर त्यांनी विश्वास करण्यास कारण होते की, करनिर्धारणातून टाळलेल उत्पन्न आहे. अधिनियमाच्या कलम ८० पी नुसार रुपये ९२,०८,८७६/- च्या बजावटीचा लाभ घेण्याची मंजुरी देता कामा नये, असे करनिर्धारण अधिकारी यांचे मत बदलण्याखेरीज काही नाही. अधिनियमाच्या कलम १४३ (३) नुसार करनिर्धारण आदेशाचा दिनांक आणि त्याची कारणे नोंदविले गेल्याच्या दिनांकच्या दरम्यान कायद्यात कोणताही बदल झालेला नाही किंवा कोणत्याही नवीन सामग्रीची ( पुराव्याची) करनिर्धारण अधिकारी यास माहिती प्राप्त झाली नाही. त्यामुळे श्री मिस्त्रि यांनी अचूकपणे उद्‌युक्त केल्याप्रमाणे हे केवळ मतांतराचे स्पष्ट उदाहरण आहे आणि त्यामुळे करनिर्धारण सुरू करण्यास परवानगी नाही.

याव्यतिरिक्त, करनिर्धारण २०१४-१५ च्या संबंधित करनिर्धारण वर्षाच्या अखेरीस, चार वर्षाच्या कालावधीनंतर पुन्हा सुरू करण्याची मागणी केली आहे आणि म्हणूनच, संबंधित करनिर्धारण कार्यवाही दरम्यान करनिर्धारणासाठी आवश्यक असलेल्या महत्त्वाच्या गोष्टी पूर्णपणे आणि खऱ्या अर्थाने उघड

करण्यात याचिकाकर्ता अपयशी ठरला आहे, हे सिद्ध करणे करनिर्धारण अधिकारी यांचे कर्तव्य होते. अशा प्रकारचे ठोस विधान नोंदविलेल्या कारणांमध्ये केलेले नाही. असे कोणतेही विधान करण्यात आलेले नाही

१२) हिंदुस्तान लिव्हर लिमिटेड विरुद्ध आर.बी.वाडकर, सहायक आयकर आयुक्त आणि इतर च्या प्रकरणात असे प्रतिपादन करण्यात आले की,

".. नोंदवलेली कारणे स्पष्ट आणि असंदिग्ध असायला हवीत आणि कोणत्याही अस्पष्टतेची बाधा असता कामा नये. नोंदवलेल्या कारणातून त्याचे म्हणजे करनिर्धारण अधिकाऱ्याचे मन प्रकट व्हावयास हवे. नोंदविलेली कारणे स्वयंस्पष्टअसायला हवीत आणि करदात्याला अंदाज बांधण्यासाठी कारणे असू नयेत. कारणे निष्कर्ष आणि पुरावा यांच्यातील दुवा दर्शवतात. नोंदविलेली कारणे पुराव्यांवर आधारित असायला हवीत. कारणांना आवाहन दिल्यास, अभिलेखावर उपलब्ध सामग्रीच्या आधारे करनिर्धारण अधिकारी त्याचे समर्थन करण्यास सक्षम असणे आवश्यक आहे. त्या करनिर्धारण वर्षाच्या करनिर्धारणासाठी करदात्याने कोणती वस्तुस्थिती किंवा सामग्री पूर्णपणे आणि खऱ्या अर्थाने आवश्यक नव्हती, त्याची कारणे त्यांनी उघड करावी जेणेकरून कारणे आणि पुरावा यांच्यात महत्वपूर्ण दुवा स्थापित होईल. हा महत्त्वाचा दुवा म्हणजे

समाप्त झालेले करनिर्धारण स्वेच्छेनुसार पुन्हा उघडण्यातून संरक्षण करणे.

वरील प्रकरणांमध्ये न्यायालयाने अधिनियमाच्या कलम १४७ च्या परंतुकानुसार अधिकारतेच्या क्षेत्रविषयक आवश्यकतेची पूर्तता केलेली नाही, या कारणास्तव अधिनियमाच्या कलम १४८ खाली आक्षेपित नोटीस रद्द केली. कारण करनिर्धारण अधिकारी यांनी नोंदवलेल्या कारणांमध्ये कुठेही नमूद केले नाही की, करदाता सर्व महत्त्वाच्या बाबी पूर्णपणे आणि खऱ्या अर्थाने उघड करण्यास अपयशी ठरले आहेत. सध्याच्या प्रकरणातही अशीच परिस्थिती आहे. जिथे नोंदविलेली कारणे करदात्याकडून कोणत्याही कसूर विषयी आरोप करत नाही, जे कारण, ' विश्वास ठेवण्यास कारणे' व्यतिरिक्त, करनिर्धारण प्रकरण पुन्हा उघडण्यासाठी पूर्व अट होती, कारण हे पुन्हा उघडण्याचे प्रकरण चार वर्षा नंतरच्या कालावधीच आहे.

१३). वरील नमूद कारणांमुळे, सध्याच्या प्रकरणातील तथ्ये आणि परिस्थिती लक्षात घेता, करनिर्धारण प्रकरण पुन्हा सुरू करणे टिकण्यासारखं नाही, असे मत व्यक्त करण्यात आम्हाला संकोच वाटत नाही.

अशा परिस्थितीत, सध्याची याचिका मंजूर करून घेण्यात येत आहे. अधिनियमाच्या कलम १४८ अंतर्गत देण्यात आलेली नोटीस आणि अधिनियमाच्या कलम १४७ सह कलम १४४ बी नुसार दिनांक ३० मार्च, २०२२ चा करनिर्धारण आदेश रद्द करण्यात येत आहे.

त्यानुसार रिट याचिका निकाली काढण्यात येत आहे.

((कमल खाटा, न्या.) ((धीरज सिंग ठाकूर, न्या।)

**अस्वीकरण**

या न्याय निर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्याय निर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

x-x-x-x